178

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग

# आदिवासी क्षेत्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा मूल्यमापन अहवाल

## वर्ष-२००४-०५

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

# अनुक्रमणिका


| अ.क्र | तपशील | | पृष्ठे | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| १ | प्रस्तावना | | १ | - |
| २ | प्रकरण क्रमांक-१ | मूल्यमापनाचा उद्देश | २ | - |
| ३ | प्रकरण क्रमांक-२ | सर्वेक्षणाची कार्यपध्दती | ३ | ४ |
| ४ | प्रकरण क्रमांक-३ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापनेचा उद्देश | ५ | १७ |
| ५ | प्रकरण क्रमांक-४ | इमारत व्यवस्था व सुविधा | १८ | २१ |
| ६ | प्रकरण क्रमांक-५ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेश, गळती व निकाल | २२ | ३० |
| ७ | प्रकरण क्रमांक-६ | प्रशिक्षणानंतर विद्यार्थी करीत असलेल्या व्यवसायाबाबतची माहिती | ३१ | ३२ |
| ८ | प्रकरण क्रमांक-७ | सूचना व शिफारशी | ३३ | ३४ |
| ९ | प्रकरण क्रमांक-८ | निष्कर्ष | ३५ | - |
| | | परिशिष्ट-१ | ३६ | ३७ |
| | | परिशिष्ट-२ | ३८ | ३९ |
| | | परिशिष्ट-३ | ४० | - |
| | | परिशिष्ट-४ | ४१ | ४४ |
| | | परिशिष्ट-५ | ४५ | ४६ |
| | | प्रपत्र १ व २ | ४७ | ५७ |

# प्रस्तावना

उत्पादन प्रक्रियेत तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता असते. औद्योगिक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठया प्रमाणात होत आहे. त्यासाठी तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता भासते. वेगवेगळया उद्योगक्षेत्रात आवश्यक असणारी तांत्रिक बाब विचारात घेवून तांत्रिक मनुष्य बळ तयार करण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत भारत सरकारच्या तांत्रिक महासंचालनालयाकडून निर्देशित केलेले व्यवसाय अभ्यासक्रम रार्बावण्यांत येतात. औद्योगिक उत्पादनांच्या घटक रचनेत लक्षणीय बदल होत असल्यामुळे तंत्र शिक्षणाच्या विस्तारासाठी आणि समन्वयासाठी सन १९८४ मध्ये राज्य शासनाकडून **व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाची** स्थापना करण्यांत आली आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये वेगवेगळया प्रकारच्या व्यवसायाचे प्रशिक्षण दिले जाते. आदिवासी विद्यार्थी कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण घेत आहेत. या प्रशिक्षणाचा आदिवासी विद्यार्थ्यांना फायदा होत आहे का ? या उद्देशाने या कार्यालयास मुल्यमापन करण्याबाबत राज्य शासनाने सुचित केले. त्याप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मुल्यमापनाचे काम हाती घेण्यांत आले.

सदर मुल्यमापन अहवालाचे क्षेत्रिय काम या संस्थेतील श्री.आर.बी.मानकर, माजी अधिव्याख्याता, श्री.आर.एल.बिरारीस, माजी अभिरक्षी , श्री.सी.जे.मोहिते कनिष्ठ लिपिक यांनी केले असून अहवाल तयार करण्याचे काम श्री.जवळेकर जी.एच. अधिव्याख्याता यांनी केले आहे. अहवालाच्या संगणकीय टंकलेखनाचे (डी.टी.पी.) काम श्री.किरण कुर्डे, लघुटंकलेखक यांनी केले. अहवाल अंतिम करण्याचे काम श्री. के.एस.चव्हाण सांख्यिकी अधिकारी व श्री.पी.बी कुदळे,संशोधन सहाय्यक यांनी श्री.एस.डी.बिराजदार उपसंचालक (एक्षेविका) यांचे मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

ठिकाण - पुणे
दिनांक :- 16/8/2006

(वाय.पी.एस.तोमर)
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

# प्रकरण क्र.१

## मूल्यमापनाचा उद्देश

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कोणत्या व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यांत येत आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रात कार्यरत असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा आदिवासी विदयार्थ्यांना कितपत फायदा होत आहे हे पाहण्यासाठी निश्चित केलेले उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

१. ज्या उद्देशाने आदिवासी क्षेत्रात औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यांत आलेल्या आहेत त्या उद्देशाप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत का ?

२. प्रशिक्षण घेतलेल्या आदिवासी विदयार्थ्यांना रोजगार उपलब्ध होतो का ?

३. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत चालू असलेल्या व्यवसायांचा अभ्यास करणे .

४. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उपलब्ध असलेल्या सोयी /सुविधांचा अभ्यास करणे ?

—x—x—x—

## प्रकरण क्र.२

# सर्वेक्षणाची कार्यपध्दती

आदिवासी उपयोजना क्षेत्रात असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे मूल्यमापनासाठी लागणारी माहिती संकलित करण्याकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्थाकडून प्रपत्र-१ मध्ये आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून प्रपत्र-२ मध्ये माहिती संकलित करण्यात आली आहे.

प्रपत्र-१ मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून संकलित करण्यात आलेल्या माहितीत खालील बाबींचा समावेश आहे.

१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत असलेल्या अभ्यासक्रमाची (ट्रेड) माहिती

२. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत असलेल्या प्रशिक्षित/अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांची माहिती

३. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अभ्यासक्रमानुसार (ट्रेड) असलेली प्रवेश क्षमता आणि प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या

४. अभ्यासक्रमानुसार उत्तीर्ण व अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती

५. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये असलेल्या सोयी सुविधा, इमारत, पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था इत्यादी बाबींची माहिती

६. प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण देण्यासाठी असलेल्या अडचणी

प्रपत्र-२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून संकलित करण्यात आलेल्या माहितीमध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

१. प्रशिक्षण घेतेवेळी प्रशिक्षणार्थीना आलेल्या अडचणी

२. प्रशिक्षण घेतेवेळी प्रशिक्षणार्थ्यांस उपलब्ध झालेल्या सुविधा

३. प्रशिक्षणानंतर उपलब्ध झालेली नोकरी/व्यवसाय

४. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थ्यांच्या उत्पन्नात झालेली वाढ इ.

सदर प्रपत्रामध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ७ जिल्हयातील १७ प्रशिक्षण संस्थांची माहिती संकलित करण्यात आली आहे. मूल्यामापन पाहणीचे काम करण्यासाठी नेमलेले पथक खालीलप्रमाणे-

१. श्री.आर.बी.मानकर, अधिव्याख्याता, पथक प्रमुख

२. श्री.आर.एल.बिरारीस, संग्रहालय अभिरक्षी

३. श्री.सी.जे.मोहिते, कनिष्ठ लिपिक

मूल्यमापनासाठी आवश्यक असणारी माहिती व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याकडून खालीलप्रमाणे घेण्यात आली आहे.

१. Achievment of Directorate (सुधारीत)

२. प्रवेश नियमावली

३. Status Report of Directorate of Vocational Education of Training (Maharashtra State)

४. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) ऑगस्ट,२००४ मधील प्रवेशाबाबतचे माहितीपत्रक

५. महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची भूसंपादन व बांधकामाची प्रगती व सद्यःस्थितीची माहिती - जून,२००४

६. Regional, District & Industrial Training institute wise intake capacity of २००३-२००४ session

—x—x—x—

## प्रकरण क्र.३

# औद्योगिक प्रशिक्षण संस्था - स्थापनेचा उद्देश

## (अ) औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापनेचा उद्देश

राज्यातील औद्योगिक उत्पादनाच्या घटक रचनेत लक्षणीय बदल झाल्यामुळे या औद्योगिक घटकांना निरनिराळया स्तरावर लागणाऱ्या तांत्रिक प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता पूर्ण करण्याच्या दृष्टीने राज्यात ३४७ शासनाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच २४१ स्वयंसेवी संस्थामार्फत राबविल्या जाणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थाअशा एकूण ५८८ संस्था स्थापन करण्यांत आलेल्या आहेत..

औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यामागील उद्देश पुढीलप्रमाणे :-

(१) एस.एस.सी.उत्तीर्ण व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगार करण्यास प्रवृत्त करणे.

(२) संस्थेच्या परिसरामध्ये असलेल्या कारखान्याची तांत्रिक गरज विचारात घेऊन त्याप्रमाणे कुशल मनुष्यबळ तयार करणे.

(३) कारखान्यातील सुविधेचा पुरेपुर उपयोग करणे, उत्पादनाची गती वाढविणे, उत्पादनाचा दर्जा वाढविणे यासाठी आवश्यक कौशल्याचे प्रशिक्षण प्रशिक्षणार्थींना देणे.

## (ब) आदिवासी उपयोजना क्षेत्रात औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्याचा उद्देश पुढीलप्रमाणे :-

(१) अल्पशिक्षित आदिवासी उमेदवारांना तांत्रिक शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी.

(२) आदिवासी उमेदवारांना अल्प कालावधीचे तांत्रिक शिक्षण मिळाल्याने नोकरी/ स्वयंरोजगार उपलब्ध होईल व त्याला स्वत:चे पायावर उभे राहता येईल.

(३) ग्रामीण परिसरात आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत असलेल्या विविध कारखान्यांना व लघुउद्योजकांना तांत्रिक व प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध व्हावे.

## (क) प्रवेशाचे सर्वसाधारण सुधारित नियम :

१. महाराष्ट्र राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतून जे व्यवसाय शिकविले जात आहेत किंवा जे व्यवसाय यापुढे शिकविले जातील त्या व्यवसायात प्रवेश देण्यासाठी सुधारीत नियमावली ऑगस्ट, २००२ पासून लागू करण्यात आली आहे.

२. प्रवेशेच्छुक उमेदवारांचे प्रवेशासाठी अर्हता प्राप्त शिक्षण ज्या तालुक्यातून झाले आहे त्या तालुक्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतून त्यांना प्रवेशासाठी अर्ज करता येतो.

३. उमेदवाराने केलेला अर्ज, प्रवेशासाठी उपलब्ध असलेल्या सर्व व्यवसायांसाठी त्यांच्या शैक्षणिक अर्हता व गुणवत्तेनुसार ग्राहय धरला जातो.

४. अर्जाचा विहित नमुना, त्यासाठी विहित केलेले शुल्क भरुन शक्यतो त्या त्या संस्थेमधून प्राप्त करुन घ्यावा व तपशील पूर्ण भरलेला अर्ज विहित मुदतीत संस्थेला सादर करावा. तथापि, एका संस्थेतून अर्ज घेतला असेल व दुसऱ्या संस्थेस प्रवेश घ्यायचा असेल तर तो अर्ज दुसऱ्या संस्थेसाठी स्विकारण्यात येतो.

* ***मागासवर्गीयांसाठी राखीव जागा (नियम क्र.१)***

१) प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या जागांपैकी खालीलप्रमाणे जाती/जमातीनिहाय राखीव जागा ठेवण्यात येतात.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | अनुसूचित जाती व बौध्दधर्म स्विकारलेल्या व्यक्ती | .. | १३ % |
| ब. | अनुसूचित जमाती (विशिष्ट भागाबाहेरील जमाती धरुन) | .. | ७% |
| क. | विमुक्त जाती व (१४ तत्सम जाती) | .. | ३% |
| ड. | भटक्या जमाती (जुलै १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम) | .. | २.५% |
| इ. | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | .. | ३.५% |
| फ. | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | .. | २% |
| प. | इतर मागासवर्गीयांकरिता | | १९% |
| | **एकूण** | | ५०% |

- मागासलेल्या जाती/जमातीच्या उमेदवारांना जिल्हा दंडाधिकारी व त्यांनी अधिकार दिलेल्या कार्यकारी दंडाधिकाऱ्यांकडून घेतलेला आवश्यक तो जाती विषयक दाखला सादर करणे आवश्यक आहे.
- **स्त्री उमेदवार :** औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील सर्व व्यवसायातून महिलांसाठी २५ टक्के आरक्षण नियम क्रं. ३ प्रमाणे प्रत्येक संवर्गासाठी म्हणजेच अनुसूचित जाती / जमाती, भटक्या व विमुक्त जाती, ओ.बी.सी. आणि खुल्या संवर्गासाठी ठेवण्यांत येते.

**अभ्यास क्षेत्र :-**

राज्यात ३४७ शासकीय आणि २४१ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या असून, याद्वारे त्यामध्ये ५६ अभ्यासक्रम शिकविण्यात येत आहेत. ३४७ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था पैकी ५६ औद्योगिक प्रशिक्षण संस्था आदिवासी

उपयोजना क्षेत्रांतर्गत कार्यरत आहेत. त्यापैकी १७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थाची मूल्यमापन पाहणी करण्यात आली असून या १७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून शिक्षण घेतलेल्या ९४ विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन माहिती घेण्यात आली आहे, त्यांची जिल्हा व तालुकानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.३.१**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नांव | सर्वेक्षणात माहिती घेतलल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | ठाणे | शहापूर | शहापूर | ४ |
| | | वाडा | वाडा | ५ |
| | | मुरबाड | मुरबाड | ५ |
| २. | नाशिक | दिंडोरी | दिंडोरी | ८ |
| | | कळवण | कळवण | ७ |
| | | इगतपूरी | इगतपूरी | २ |
| ३. | नंदूरबार | शहादा | शहादा | ६ |
| | | तळोदा | तळोदा | ५ |
| | | नंदूरबार | नंदूरबार | ६ |
| ४. | अमरावती | अचलपूर | अचलपूर | ५ |
| | | धारणी | धारणी | ५ |
| | | चिखलदरा | चिखलदरा | ५ |
| ५. | यवतमाळ | पांढरकवडा | पांढरकवडा | ५ |
| ६. | नांदेड | किनवट | किनवट | ५ |
| | | हदगांव | हदगांव | ३ |
| ७. | चंद्रपूर | कोरपना | कोरपना | ५ |
| | | राजूरा | राजूरा | १३ |
| | | | **एकूण** | **९४** |

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १५ व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील २ अशा एकूण १७ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील सन २०००१-०२ व २००२-०३ ची प्रवेश क्षमता, प्रवेशित विद्यार्थी, आदिवासींसाठी आरक्षित जागा व उत्तीर्ण आदिवासी विद्यार्थी यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.३.२ (वर्ष २००१ - ०२)**

| अ. क्र. | जिल्हा | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नांव | एकूण व्यवसाय (ट्रेड) | एकूण प्रवेश क्षमता | ७५% प्रमाणे आदिवासी करिता आरक्षित जागा | प्रत्यक्ष प्रवेश दिलेले विद्यार्थी | परीक्षसेस बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी | उत्तीणाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ठाणे | शहापूर | ४ | ६० | ४५ | ११ | १ | ० | ० |
| | | वाडा | ५ | ७६ | ५७ | ८ | ३ | ३ | १०० |
| | | मुरबाड | ५ | ७६ | ५७ | ० | ० | ० | ० |
| २. | नाशिक | दिंडोरी | १४ | २३२ | १७४ | १५२ | ९८ | ६६ | ६७ |
| | | कळवण | ९ | ३४० | २५५ | १६६ | ६३ | १९ | ३० |
| | | इगतपूरी | ६ | ९२ | ६९ | ३३ | ९ | ३ | ३३ |
| ३. | नंदूरबार | शहादा | ५ | ७६ | ५७ | ४५ | ११ | ९ | ८२ |
| | | तळोदा | ४ | ९२ | ६९ | ४४ | २१ | २० | ९५ |
| | | नंदूरबार | १९ | ३९६ | २९७ | २०० | २१७ | १६७ | ७७ |
| ४. | नांदेड | किनवट | ७ | १२० | ९० | ७९ | ७४ | ६४ | ८६ |
| | | हदगांव | ३ | ४४ | ३ | २ | ० | ० | ० |
| ५. | अमरावती | धारणी | ६ | ७६ | ५७ | ३२ | ५ | ३ | ६० |
| | | चिखलदरा | ८ | १३६ | १०२ | ७२ | ५४ | ३७ | ६९ |
| | | अचलपूर | ६ | ९२ | ६ | ५ | ४ | ३ | ७५ |
| ६. | यवतमाळ | पांढरकवडा | ८ | १६८ | १२६ | ६५ | ४९ | २१ | ४३ |
| ७. | चंद्रपूर | कोरपना | ४ | ६० | ४५ | १६ | १४ | १३ | ९३ |
| | | राजूरा | ८ | १६४ | १२३ | ११७ | ३३ | १२ | ३६ |
| | | **एकूण** | **१२१** | **२३००** | **१६३२** | **१०४७** | **६५६** | **४४०** | **६७** |

सन २००१-०२ वर्षासाठी आदिवासी साठी ७५% नुसार १६३२ आरक्षित जागा होत्या. त्यापैकी १०४७ (६४%) विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेले आहेत. त्यापैकी ६५६ (६३%) विद्यार्थी परीक्षेस बसलेले आहेत. परीक्षेस बसलेल्या ६५६ विद्यार्थ्यापैकी ४४० (६७%) आदिवासी विद्यार्थी पास झालेले आहेत.

**तक्ता क्र.३.३**

**वर्ष-२००२-०३**

| अ. क्र. | जिल्हा | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नांव | एकूण व्यवसाय (ट्रेड) | एकूण प्रवेश क्षमता | ७५% नुसार आदिवासी करिता आरक्षित जागा | प्रत्यक्ष प्रवेश दिलेले विद्यार्थी | परीक्षसेस बसलें विद्यार्थी | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी | उत्तीणाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ठाणे | शहापूर | २ | २८ | २१ | ४ | १० | ८ | ८० |
| | | वाडा | ३ | ७६ | ५७ | १६ | १३ | १० | ७७ |
| | | मुरबाड | ३ | ४४ | ३३ | ० | ० | ० | ० |
| २. | नाशिक | दिंडोरी | १४ | २३२ | १७४ | १११ | ८३ | ३४ | ४१ |
| | | कळवण | ९ | ४५६ | ३४२ | १५९ | ९४ | ८० | ८५ |
| | | इगतपूरी | ४ | ६० | ४५ | ८ | २१ | १७ | ९१ |
| ३. | नंदूरबार | शहादा | २ | २८ | २१ | १५ | ३६ | ३६ | १०० |
| | | तळोदा | ६ | ६० | ४५ | ३५ | ११ | ११ | १०० |
| | | नंदूरबार | १९ | ३९६ | २९७ | २१२ | १८७ | १८७ | १०० |
| ४. | नांदेड | किनवट | ७ | १२० | ९० | २५ | १८ | १२ | ६७ |
| | | हदगांव | ५ | ४४ | ३ | २ | २ | २ | १०० |
| ५. | अमरावती | धारणी | ६ | ४० | ३० | २१ | १६ | ५ | ३१ |
| | | चिखलदरा | ८ | १५२ | ११४ | ४१ | ४५ | ३२ | ७१ |
| | | अचलपूर | ३ | ९२ | ३ | ३ | ३ | ३ | १०० |
| ६. | यवतमाळ | पांढरकवडा | ८ | १०४ | ७८ | ४५ | ५६ | १६ | २९ |
| ७. | चंद्रपूर | कोरपना | ६ | ९२ | ६९ | ११ | ५ | ५ | १०० |
| | | राजूरा | ८ | २१२ | १५९ | ३८ | ४३ | ७ | १६ |
| | | **एकूण** | **११३** | **२२३६** | **१५८१** | **८२६** | **६४३** | **४६५** | **७२** |

सर्वेक्षण करण्यात आलेल्या १७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये ७५% नुसार आदिवासींसाठी १५८१ आरक्षित जागा आहेत. प्रत्यक्ष प्रवेश दिलेले विद्यार्थी ८२६ (५२%) आहेत. त्यापैकी परीक्षेस बसलेले विद्यार्थी ६४३ (७८%) आहेत. तर उत्तीर्ण झालेले विद्यार्थी ४६५ (७२%) आहेत.

## ट्रेड/व्यवसाय अभ्यासक्रमनिहाय प्रवेश-२००३-०४

सर्वेक्षणातील १७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यवसायनिहाय (ट्रेड) २००३-०४ वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

### (अ) एक वर्ष मुदत असलेला व्यवसाय अभ्यासक्रम

तक्ता क्र.३.४

| अ. क्र. | व्यवसाय अभ्यासक्रमाचे नांव (ट्रेड) | प्रवेशित विद्यार्थी संख्या | | | अनु.जमाती विद्यार्थ्यांची एकूण विद्यार्थीशी टक्केवारी | बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची एकूण विद्यार्थ्यांशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु. जमाती (आदिवासी) | बिगर आदिवासी | एकूण | | |
| १. | सुतार | १ | ३३ | ३४ | ३ | ९७ |
| २. | संधाता | १३० | १४३ | २७३ | ४८ | ५२ |
| ३. | यांत्रिक कर्षण | ११ | ६० | ७१ | १५ | ८५ |
| ४. | पत्रे कारागीर | ३१ | ४३ | ७४ | ४२ | ५८ |
| ५. | यांत्रिक डिझेल | ९१ | १४४ | २३५ | ३९ | ६१ |
| ६. | ड्रेसमेकींग | १५ | ५५ | ७० | २१ | ७९ |
| ७. | पंप ऑपरेटर | ० | ११ | ११ | - | १०० |
| ८ | बेकरी कन्फेक्शनरी | ० | ० | ० | - | - |
| ९. | गवंडी | १ | ९ | १० | १० | ९० |
| १० | कर्तन शिलाई | २९ | ६५ | ९४ | ३१ | ६९ |
| ११. | कॉम्प्युटर ऑपरेटींग अँड प्रोग्रॅमिंग | ६६ | २५ | ९१ | ७३ | २७ |
| १२. | लघुलेखन मराठी | २९ | ६ | ३५ | ८३ | १७ |
| १३. | लघुलेखन इंग्रजी | ८ | २१ | २९ | २८ | ७२ |
| | एकूण | ४१२ | ६१५ | १०२७ | ४० | ६० |

### (ब) दोन वर्ष मुदत असलेला व्यवसाय अभ्यासक्रम

तक्ता क्र.३.५

| अ. क्र. | व्यवसाय अभ्यासक्रमाचे नांव (ट्रेड) | प्रवेशित विद्यार्थी संख्या | | | अनु.जमाती विद्यार्थ्यांची एकूण विद्यार्थीशी टक्केवारी | बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची एकूण विद्यार्थ्यांशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु. जमाती (आदिवासी) | बिगर आदिवासी | एकूण | | |
| १. | वीजतंत्री | ११५ | ८५ | २०० | ५८ | ४२ |
| २. | तारतंत्री | ८८ | ८८ | १७६ | ५० | ५० |
| ३. | जोडारी | ७० | १४९ | २१९ | ३२ | ६८ |
| ४. | यांत्रिक (मोटारगाडी) | ८३ | ४४ | १२७ | ६५ | ३५ |

| अ. क्र. | व्यवसाय अभ्यासक्रमाचे नांव (ट्रेड) | प्रवेशित विद्यार्थी संख्या | | | अनु.जमाती विद्यार्थ्यांची एकूण विद्यार्थीशी टक्केवारी | बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची एकूण विद्यार्थ्यांशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु. जमाती (आदिवासी) | बिगर आदिवासी | एकूण | | |
| ५. | यांत्रिक (रेडिओ /टीव्ही) | ३३ | ३६ | ६९ | ४८ | ५२ |
| ६. | यंत्र कारागीर | ३६ | २६ | ६२ | ५८ | ४२ |
| ७. | इलेक्ट्रॉनिक मेकॅनिक | ४१ | १६ | ५७ | ७२ | २८ |
| ८ | आरेखक (स्थापत्य) | २० | १५ | ३५ | ५७ | ४३ |
| ९. | कातारी | ८ | २८ | ३६ | २२ | ७८ |
| १० | यांत्रिक (प्रा.शि.) | ० | १६ | १६ | ० | १०० |
| ११. | विजारी/विजाणू | ८ | ८ | १६ | ५० | ५० |
| १२. | हत्यारे (साचेकार) | २ | १७ | १९ | ११ | ८९ |
| १३ | आर.अे.सी. | १ | १७ | १८ | ६ | ९४ |
| १४ | माहिती तंत्रज्ञान | १५ | ४ | १९ | ७९ | २१ |
| | **एकूण** | **५२०** | **५४९** | **१०६९** | **४९** | **५१** |

वरील तक्ता क्र.३.४ मधील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, एक वर्ष मुदतीच्या १३ व्यवसाय अभ्यासक्रमात सन २००३-०४ वर्षात १०२७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून यांत संधाता व्यवसायात सर्वात जास्त २७३ विद्यार्थी असून त्यांची एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांशी टक्केवारी २७% आहे. यांत्रिक डिझेल व्यवसायात २४४ कर्तन शिलाई व्यवसायात ९४, कॉम्प्युटर ऑपरेटींग अँड प्रोग्रॅमिंग व्यवसायात ९१, पत्रे कारागीर -७४, यांत्रिक कर्षण ७१ विद्यार्थी प्रवेशित असून याची एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांची टक्केवारी अनुक्रमे २३% ,९%, ९%,७% व ७ याप्रमाणे आहे. सर्वात कमी प्रवेशित विद्यार्थी बेकरी कन्फेशनरी (०), गवंडी (१०), पंप ऑपरेटर (११) या व्यवसायात असून, त्याची एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांशी टक्केवारी अनुक्रमे ०%,०.९७% व १.०७% याप्रमाणे आहे. एक वर्ष मुदतीच्या अभ्यासक्रमात एकूण प्रवेशित १०२७ विद्यार्थ्यामध्ये अनुसूचित जमातीचे प्रवेशित विद्यार्थी ४१२ असून याची एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांशी टक्केवारी ४० आहे आणि बिगर आदिवासी प्रवेशित विद्यार्थी ६१५ असून याची टक्केवारी ६० इतकी आहे.

वरील तक्ता क्र.३.५ मधील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, दोन वर्ष मुदतीच्या १४ व्यवसाय अभ्यासक्रमात सन २००३-०४ वर्षात १०६९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यात **जोडारी** व्यवसायात सर्वात जास्त २१९ विद्यार्थी प्रवेशित असून याची एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांशी टक्केवारी २०% आहे. वीजतंत्री व्यवसायात २००, तारतंत्री व्यवसायात १७६, यांत्रिक मोटार गाडी-१२७, प्रवेशित विद्यार्थी असून याची एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांशी टक्केवारी अनुक्रमे १९%, १६% व १२ टक्के याप्रमाणे आहे. सर्वात कमी प्रवेशित विद्यार्थी यांत्रिक (प्रा.शि.)-१६, विजारी/विजाणू-१६, हत्यारे साचेकार-१९, या व्यवसायात असून याची एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांची टक्केवारी १.४९%, १.४९%, १.७७% याप्रमाणे आहे. दोन वर्ष मुदतीच्या अभ्यासक्रमात एकूण प्रवेशित १०६९ विद्यार्थ्यामध्ये अनुसूचित जमातीचे प्रवेशित विद्यार्थी ५२० एकूण पर्यवेशित विद्यार्थीशी टक्केवारी ४९

आहे. आणि बिगर आदिवासी प्रवेशित विद्यार्थी ५४९ असून त्यांची टक्केवारी ५१ %आहे.एक वर्ष व दोन वर्ष मुदतीच्या दोन्ही व्यवसायात प्रवेशित एकूण विद्यार्थी २०९६ आहेत. यापैकी अनुसूचित जमातीचे विद्यार्थी ९३२ व बिगर आदिवीस ११६४ आहेत. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांशी टक्केवारी ४४ % असून बिगर आदिवासी विद्यार्थी ११६४ असून एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांशी टक्केवारी ५६ % इतकी आहे.

**आदिवासी उपयोजना क्षेत्रात असलेल्या एकूण ५६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची सन २००३-०४ ची माहिती**

**प्रवेश क्षमता, प्रत्यक्ष प्रवेश व रिक्त जागा पुढीलप्रमाणे आहेत.**

**तक्ता क्र.३.६**

| अ.क्र. | विभाग | एकूण औ.प्र.शि. संख्या | मंजूर जागा |
|---|---|---|---|
| १. | मुंबई | ९ | १३२८ |
| २. | पुणे | १ | ३४४ |
| ३. | नाशिक | १७ | २७२० |
| ४. | औरंगाबाद | १ | १२० |
| ५. | अमरावती | ७ | ८६८ |
| ६. | नागपूर | २१ | ३०७२ |
| | एकूण | ५६ | ८४५२ |

**आदिवासी उपयोजना क्षेत्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अभ्यासक्रम :**

आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये एकूण ५६ औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. त्यापैकी १५ औद्योगिक प्रशिक्षण सस्थांचे सर्वेक्षण करण्यात आले असून सदर १५ प्रशिक्षण संस्थामधील अभ्यासक्रमाची माहिती पुढील विवरणपत्रामध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र.३.७**

| अ. क्र. | क्षेत्र | औ.प्र. संस्था एकूण | शासकीय औद्यो.प्रशिक्षण संस्थांची नांवे | | स्थापना वर्ष | सर्वेक्षण करण्यात आलेल्या १५ शासकीय औद्य.प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रम संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वर्ष २००१-०२ | वर्ष २००२-०३ |
| १. | मुंबई | ०९ | १. | शहापूर | १९९५ | ४ | २ |
| | | | २. | वाडा | १९९५ | ५ | ३ |
| | | | ३. | मुरबाड | १९९५ | ५ | ३ |
| २. | पुणे | ०१ | १. | माणिकडोह | १९७७ | - | - |
| ३. | नाशिक | १७ | १. | दिंडोरी | १९७७ | १४ | ८ |
| | | | २. | कळवण | १९८४ | ९ | ७ |
| | | | ३. | इगतपूरी | १९९५ | ६ | ४ |
| | | | ४. | शहादा | १९९७ | ५ | २ |

| अ. क्र. | क्षेत्र | औ.प्र. संस्था एकूण | शासकीय औद्यो.प्रशिक्षण संस्थांची नांवे | | स्थापना वर्ष | सर्वेक्षण करण्यात आलेल्या १५ शासकीय औद्य.प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रम संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वर्ष २००१-०२ | वर्ष २००२-०३ |
| | | | ५. | तळोदा | १९९५ | ४ | ६ |
| | | | ६. | नंदूरबार | १९७६ | १९ | १९ |
| ४. | औरंगाबाद | ०१ | १. | किनवट | १९८४ | ७ | ७ |
| ५. | अमरावती | ०७ | १. | चिखलदरा | १९८१ | ८ | ९ |
| | | | २. | धारणी | १९९५ | ६ | ६ |
| | | | ३. | पांढरकवडा | १९८५ | ८ | ८ |
| ६. | नागपूर | २१ | १. | कोरपना | १९९६ | ४ | ६ |
| | | | २. | राजूरा | १९८९ | ८ | ८ |
| | एकूण | ५६ | | - | - | ११२ | १०५ |

**ड) आदिवासी भागातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिकविले जाणारे व्यवसाय अभ्यासक्रम :**

महाराष्ट्र राज्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्थातून एकूण ५६ व्यवसायांचे प्रशिक्षण देण्यात येते त्याचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुदत/कालावधी | अभ्यासक्रम | | |
|---|---|---|---|---|
| | | अभियांत्रिकी व्यवसाय | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | एकूण |
| १ | एक वर्ष मुदतीचे अभ्यासक्रम | १३ | १४ | २७ |
| २ | दोन वर्ष मुदतीचे अभ्यासक्रम | २७ | - | २७ |
| ३ | तीन वर्ष मुदतीचे अभ्यासक्रम | २ | - | २ |
| | **एकूण** | **४२** | **१४** | **५६** |

सर्व्हेक्षणांतर्गत एकूण १७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची पाहणी करण्यात आली आहे. त्यामध्ये शिकविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमाची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

१. एक वर्ष मुदतीचे अभ्यासक्रम - १३

२. दोन वर्ष मुदतीचे अभ्यासक्रम - १३

३. तीन वर्ष मुदतीचे अभ्यासक्रम - १

---------------

**एकूण २७**

---------------

एकूण ५६ व्यवसाय अभ्यासक्रमापैकी २७ व्यवसाय अभ्यासक्रम सर्व्हेक्षणासाठी निवडलेल्या १७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून शिकविले जातात त्याची यादी पुढीलप्रमाणे आहे.

**एक वर्ष मुदतीचे अभ्यासक्रम**

१. सुतारकाम
२. संधाता
३. यांत्रिक कृषिन्न
४. पत्रे कारागिर
५. यांत्रिक डिझेल
६. ड्रेस मेकिंग
७ पंप ऑपरेटर
८. कॉम्प्युटर ऑपरेटर व प्रोग्रॅम असिस्टंट
९. गवंडी
१०. कर्तन शिलाई
११. लघुलेखन मराठी
१२. लघुलेखन इंग्रजी
१३. बेकरी कन्फेक्शनरी

**दोन वर्ष मुदतीचे अभ्यासक्रम**

१. वीजतंत्री
२. तारतंत्री
३. जोडारी
४. कातारी
५. यांत्रिक प्राशी व वातानुकूलीत मेकॅनिक RAC
६. यांत्रिक मोटारगाडी
७. विजाणू
८. यांत्रिक रेडियो, टी.व्ही.
९. यंत्र कारागीर
१०. रंगारी (जनरल)
११. यांत्रिकी इलेक्ट्रॉनिक्स
१२. आरेखक स्थापत्य
१३. इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी

**तीन वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम**

१. टूल व डाय मेकर (हायकोसालोडार)

सर्व्हेक्षणातील १७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमाची जिल्हानिहाय व तालुकानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे .

| अ. क्र. | जिल्हा | | तालुके | कालावधी प्रमाणे असलेले अभ्यासक्रम | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ वर्ष | २ वर्ष | ३ वर्ष | एकूण |
| (१) | ठाणे | १. | शहापूर | ०२ | ०२ | ० | ०४ |
| | | २. | वाडा | ०३ | ०२ | ० | ०५ |
| | | ३. | मुरबाड | ०३ | ०२ | ० | ०५ |
| | | | **एकूण-०३** | **०८** | **०६** | **०** | **१४** |
| (२) | नाशिक | १. | दिंडोरी | ०५ | ०९ | ० | १४ |
| | | २. | कळवण | ०१ | ०८ | ० | ०९ |
| | | ३. | इगतपूरी | ०४ | ०२ | ० | ०६ |
| | | | **एकूण-०३** | **१०** | **१९** | **०** | **२९** |
| (३) | नंदूरबार | १. | शहादा | ०२ | ०३ | ० | ०५ |
| | | २. | तळोदा | ०४ | ०२ | ० | ०६ |
| | | ३. | नंदूरबार | ०८ | १० | ०१ | १९ |
| | | | **एकूण-०३** | **१४** | **१५** | **०१** | **३०** |
| (४) | अमरावती | १. | अचलपूर | ०३ | ०३ | ० | ०६ |
| | | २. | धारणी | ०४ | ०२ | ० | ०६ |
| | | ३. | चिखलदरा | ०४ | ०५ | ० | ०९ |
| | | | **एकूण-०३** | **११** | **१०** | **०** | **२१** |
| (५) | यवतमाळ | १. | पांढरकवडा | ०२ | ०६ | ० | ०८ |
| | | | **एकूण-०१** | २ | ६ | ० | ८ |
| (६) | नांदेड | १. | किनवट | ०३ | ०४ | ० | ०७ |
| | | २. | हदगांव | ०३ | ०५ | ० | ०८ |
| | | | **एकूण-०२** | **०६** | **९** | **०** | **१५** |
| (७) | चंद्रपूर | १. | कोरपना | ०४ | ०२ | ० | ०६ |
| | | २. | राजूरा | ०२ | ०६ | ० | ०८ |
| | | | **एकूण-०२** | **०६** | **०८** | **०** | **१४** |
| **एकूण जिल्हे ०७** | | | **१७** | **५७** | **७३** | **०१** | **१३१** |

## व्यावसायिक अभ्यासक्रमाचे वर्गीकरण

सर्व्हेक्षणातील ७ जिल्यातील १७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये राबविण्यात येणारे व्यावसायिक अभ्यासक्रम किती औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत चालू आहेत याचा कालावधीप्रमाणे अभ्यासक्रम निहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | एकूण औ.प्र. संस्था |
|---|---|---|
| **अ)** | **एक वर्ष मुदतीचे अभ्यासक्रम** | |
| १. | संधाता | १४ |
| २. | यांत्रिक डिझेल | ८ |
| ३. | ड्रेस मेकिंग | ८ |
| ४. | पत्रे कारागिर | ५ |
| ५. | गवंडी | ४ |
| ६. | सुतारकाम | ३ |
| ७. | पंप ऑपरेटर | ३ |
| ८. | कॉम्प्युटर ऑपरेटर | ३ |
| ९. | कर्तन शिलाई | ३ |
| १०. | यांत्रिक कर्षक | २ |
| ११. | बेकरी अॅण्ड कन्फेक्शनरी | २ |
| १२. | लघुलेखन मराठी | १ |
| १३. | लघुलेखन इंग्रजी | १ |
| **ब)** | **दोन वर्ष मुदतीचे अभ्यासक्रम** | |
| १. | जोडारी | १४ |
| २. | विजतंत्री | १३ |
| ३. | तारतंत्री | १३ |
| ४. | यांत्रिक मोटारगाडी | ९ |
| ५. | यांत्रिक रेडियो व टी.व्ही. | ६ |
| ६. | यांत्रिक इलेक्ट्रॉनिक्स | ४ |
| ७. | कातारी | ३ |
| ८. | यंत्र कारागिर | ३ |
| ९. | आरेखक स्थापत्य | ३ |
| १०. | यांत्रिक प्राशी व वातानुकूलीत | २ |
| ११. | विजाणू | १ |
| १२. | रंगारी | १ |
| १३. | माहिती व तंत्रज्ञान | १ |
| **क)** | **तीन वर्ष मुदतीचे अभ्यासक्रम** | |
| १. | टूल अॅण्ड डाय मेकर | १ |

**इ) आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा :**

१. वसतिगृहाची सोय असल्यास प्रवेशित प्रशिक्षणार्थींना मासिक रु. २०/- याप्रमाणे शुल्क आकारले जाते.

२. चलत यंत्राशी संबंधित व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यास विनामूल्य ॲप्रन

३. खेळ, करमणूक

४. एस.टी. / रेल्वे प्रवास सवलत

५. विनामूल्य वैद्यकीय तपासणी

६. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकडून प्रशिक्षण शुल्क घेतले जात नाही.

वरीलप्रमाणे प्रवेशार्थींना सेवा सुविधा पुरविल्या जातात.

**ई) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये आदिवासी उमेदवारांना देण्यात येणारे अर्थसहाय्य**

दरमहा रु.६०/- प्रमाणे विद्यावेतन देण्यात येते.

**फ) लोकसेवा केंद्र**

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक आयटीआय १००२/(९८)/व्य.शि.२, दिनांक १७ जुलै, २००२ प्रमाणे राज्यातील ११३ औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये **लोकसेवा केंद्र** स्थापन करण्यात आली आहेत. यासाठी शासनाने प्रत्येक जिल्हयात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली १२ सदस्यांची समिती गठीत केलेली आहे.

**लोकसेवा केंद्राचा** मुख्य उद्देश असा आहे की, जे विद्यार्थी निरनिराळे व्यवसाय अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण होतात अशा प्रशिक्षणार्थींना रोजगाराची संधी उपलब्ध होण्यासाठी उमेदवारांचे गट करुन त्या गटाची सहकारी संस्था स्थापन करुन संस्थाच्या माध्यमातून विविध प्रकारची कामे स्विकारण्यात यावीत व सदरची कामे करण्यासाठी लागणारी यंत्र सामग्री, जागा, औजारे या बाबी प्रस्तुत सहकारी संस्थाना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध होते या साधन सामुग्रीचा उपयोग करुन प्रशिक्षणार्थींना रोजगार उपलब्ध करुन द्यावा या उद्देशाने **लोकसेवा केंद्राची** स्थापना करण्यात आली आहे. या संस्थांनी शासकीय/निम शासकीय/स्वायत्त संस्था/महामंडळे/नगरपालिका यांचेकडे प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांचेकडील छोटी छोटी कामे उदा. नळकाम (plumbing), सुतारकाम (carpentary), वायरिंग, रंगरंगोटी (painting), वाहनदुरुस्ती, फर्निचर दुरुस्ती, इत्यादी कामे करावीत, असा या योजनेचा उद्देश आहे.

प्रस्तुत कामासाठी संस्थांना कर्जाची आवश्यकता भासल्यास सदर लोकसेवा केंद्रा मार्फत वित्तीय संस्थांकडून कर्ज पुरवठा करण्यात येतो.

***

**प्रकरण क्र.४**

# इमारत व्यवस्था व सुविधा

**अ)** सर्वेक्षणासाठी हाती घेण्यात आलेल्या १७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थाच्या इमारतीबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**शासकीय इमारती असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची माहिती**

| अ.क्र. | जिल्हा | ठिकाण | स्थापना वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | वाडा | १९-९-१९९५ | |
| २ | नाशिक | दिंडोरी | १-८-१९७७ | |
| ३ | नाशिक | कळवण | ५-९-१९८४ | |
| ४ | नाशिक | इगतपुरी | १-८-१९९५ | |
| ५ | नंदूरबार | नंदूरबार | -८-१९७६ | |
| ६ | अमरावती | चिखलदरा | २४-८-१९८१ | |
| ७ | यवतमाळ | पांढरकवडा | २३-८-१९८४ | |
| ८ | नांदेड | किनवट | - -१९८४ | |
| ९ | नांदेड | हदगांव | ३-८-१९७४ | |
| १० | चंद्रपूर | राजुरा | -८-१९८९ | |

**भाडयाच्या इमारती मध्ये कार्यान्वित असलेल्या सात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची माहिती**

| अ. क्र. | जिल्हा | ठिकाण | भाडे प्रतिमाह | स्थापना वर्ष | क्षेत्रफळ | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | शहापूर | १२,७६६ | २२-९-१९९५ | ४०२.०३ चौ.मी. | शासकीय जमीन उपलब्ध |
| २ | ठाणे | मुरबाड | १२,३७४ | -९-१९९५ | ३४६.६८ चौ.मी. | शासकीय इमारतीचे बांधकाम प्रगती पथावर |
| ३ | नंदूरबार | शहादा | १९,५०६ | ४-८-१९९७ | ५८३.०० चौ.मी. | शासकीय जमीन उपलब्ध |
| ४ | नंदूरबार | तळोदा | ७,०३७ | १६-८-१९९५ | ५७५.०० चौ.मी. | शासकीय जमीन उपलब्ध |
| ५ | अमरावती | अचलपूर | ३,४५० | १०-१०-१९९५ | ३८७५.५० चौ.मी. | शास.जमीन उपलब्ध नाही |
| ६ | अमरावती | धारणी | २,२१० | १८-१०-१९९५ | ५३१.०० चौ.मी. | इमारत बांधकाम सुरु आहे |
| ७ | चंद्रपूर | कोरपना | ६,२७० | ९-८-१९९६ | १३२६.२१ चौ.मी. | शासकीय जमीन उपलब्ध |

**ब) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीमध्ये विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या सुविधांची औद्योगिक प्रशिक्षण संस्थानिहाय माहिती**

| अ. क्र. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था ठिकाण | जिल्हा | विजेची सोय | पाणी उपलब्धतेची सोय | स्नानगृह | | शौचालय | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मुले | मुली | मुले | मुली |
| १ | शहापूर | ठाणे | आहे | नळ | २ | १ | २ | १ |
| २ | वाडा | ठाणे | आहे | बोअरवेल | - | - | - | - |
| ३ | मुरबाड | ठाणे | आहे | नळ | १ | १ | १ | १ |
| ४ | दिंडोरी | नाशिक | आहे | बोअरवेल | - | - | ४ | २ |
| ५ | कळवण | नाशिक | आहे | विहीर | २ | १ | २ | २ |
| ६ | इगतपुरी | नाशिक | आहे | नळ | - | - | १ | १ |
| ७ | शहादा | नंदूरबार | आहे | बोअरवेल | १ | १ | १ | १ |
| ८ | तळोदा | नंदूरबार | आहे | नळ | - | - | ३ | १ |
| ९ | नंदूरबार | नंदूरबार | आहे | बोअरवेल | - | - | १० | १ |
| १० | अचलपूर | अमरावती | आहे | नळ | - | - | - | - |
| ११ | धारणी | अमरावती | नाही | बोअरवेल | १ | १ | १ | १ |
| १२ | चिखलदरा | चिखलदरा | आहे | नळ | ४ | १ | ४ | १ |
| १३ | पांढरकवडा | यवतमाळ | आहे | बोअरवेल | - | - | - | - |
| १४ | किनवट | नांदेड | आहे | बोअरवेल | ४ | - | - | - |
| १५ | हदगांव | नांदेड | अपुरी | नाही | - | - | - | - |
| १६ | कोरपना | चंद्रपूर | आहे | बोअरवेल | - | - | - | - |
| १७ | राजुरा | चंद्रपूर | आहे | बोअरवेल | - | - | १० | ४ |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सर्व्हेक्षण केलेल्या १७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांपैकी १० संस्था या शासकीय इमारतीत कार्यरत असून ७ संस्था या भाडयाच्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत. इमारत भाडयापोटी दरमहा रु. ६३,६१३/- एवढा खर्च होत आहे.

७ संस्था भाडयाच्या इमारतीत कार्यरत आहेत त्यापैकी ६ संस्थांना शासकीय जमीन उपलब्ध झाली असून २ संस्थांच्या इमारतीचे बांधकाम चालू आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र अचलपूर, जिल्हा अमरावती या संस्थेस अद्यापी शासकीय जमीन उपलब्ध झालेली नाही.

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नांव | कामाचे स्वरुप | कामाची प्रगती | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | शहापूर | १) प्रशासकीय इमारत<br>२) कार्यशाळा | ढोबळ अंदाज पत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले आहे | २९% |
| २ | ठाणे | मुरबाड | १) प्रशासकीय इमारत<br>२) कार्यशाळा | चौथऱ्यापर्यंत<br>चौथऱ्यापर्यंत | २९% |
| ३ | नंदूरबार | शहादा | १) प्रशासकीय इमारत<br>२) कार्यशाळा | चौथऱ्यापर्यंत<br>चौथऱ्यापर्यंत | २९% |

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नांव | कामाचे स्वरुप | कामाची प्रगती | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| ४ | नंदूरबार | तळोदा | १) प्रशासकीय इमारत<br>२) कार्यशाळा | चौथऱ्यापर्यंत<br>चौथऱ्यापर्यंत | २९% |
| ५ | अमरावती | अचलपूर | - | भूसंपादनाची प्रक्रिया चालू आहे | |
| ६ | अमरावती | धारणी | १) प्रशासकीय इमारत<br>२) कार्यशाळा | सुरुवात नाही<br>सुरुवात नाही | - |
| ७ | चंद्रपूर | कोरपना | १) प्रशासकीय इमारत<br>२) कार्यशाळा | चौथऱ्यापर्यंत<br>चौथऱ्यापर्यंत | २९% |
| ८ | नांदेड | हदगांव | १) प्रशासकीय इमारत<br>२) कार्यशाळा | छतापर्यंत गिलावा<br>छतापर्यंत गिलावा | ८९% |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, हदगांव, जिल्हा नांदेड येथील इमारतीचे बांधकाम हे ८९% पूर्ण असून इतर सर्व इमारतींचे बांधकाम २९% झाल्याचे दिसून येते.

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अधिकारी/कर्मचारी सद्यःस्थिती :**

१७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षित व अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांची संस्था निहाय संख्या खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | औ.प्र.संस्थेचे नांव | जिल्हा | प्रशिक्षित | अप्रशिक्षित | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | औ.प्र.संस्था शहापूर | ठाणे | ०४ | ०० | ०४ |
| २ | औ.प्र.संस्था वाडा | ठाणे | ०३ | ०० | ०३ (२) |
| ३ | औ.प्र.संस्था मुरबाड | ठाणे | ०० | ०५ | ०५ |
| ४ | औ.प्र.संस्था दिंडोरी | नाशिक | २९ | ०० | २९ |
| ५ | औ.प्र.संस्था कळवण | नाशिक | ०७ | ०९ | १६ |
| ६ | औ.प्र.संस्था इगतपुरी | नाशिक | ०६ | ०० | ०६ |
| ७ | औ.प्र.संस्था शहादा | नंदूरबार | ०१ | ०४ | ०५ |
| ८ | औ.प्र.संस्था तळोदा | नंदूरबार | ०६ | ०० | ०६ |
| ९ | औ.प्र.संस्था नंदूरबार | नंदूरबार | २१ | ०९ | ३० |
| १० | औ.प्र.संस्था अचलपूर | अमरावती | ०३ | ०३ | ०६ |
| ११ | औ.प्र.संस्था धारणी | अमरावती | ०५ | ०० | ०५ (२) |
| १२ | औ.प्र.संस्था चिखलदरा | अमरावती | १४ | ०० | १४ |
| १३ | औ.प्र.संस्था पांढरकवडा | यवतमाळ | ११ | ०० | ११ |
| १४ | औ.प्र.संस्था किनवट | नांदेड | ०६ | ०० | ०६ |
| १५ | औ.प्र.संस्था हदगांव | नांदेड | ०८ | ०० | ०८ |
| १६ | औ.प्र.संस्था कोरपना | चंद्रपूर | ०६ | ०० | ०६ |
| १७ | औ.प्र.संस्था राजूरा | चंद्रपूर | १४ | ०१ | १५ |
| | | **एकूण** | **१४४** | **३१** | **१७५** |

**(ड) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उत्तीर्ण झाल्यानंतर सर्वेक्षण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे व्यावसायिक वर्गीकरण**

७ जिल्हयातील १७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील सन २००१-२००२ व २००२-२००३ या शैक्षणिक सत्रात उत्तीर्ण झालेल्या ९४ प्रशिक्षणार्थींची व्यवसाय अभ्यासक्रमनिहाय वर्गवारी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | सर्व्हेक्षित एकूण प्रशिक्षणार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वीजतंत्री (इलेक्ट्रीशियन) | २४ | २५% |
| २ | संधाता (वेल्डर) | १८ | १९% |
| ३ | जोडारी (फिटर) | ११ | १२% |
| ४ | ड्रेसमेकींग/ कर्तन व शिवण | ९ | १०% |
| ५ | मोटर मेकॅनिक | ११ | १२% |
| ६ | यंत्र कारागीर (कर्षण) | ५ | ५% |
| ७ | तारतंत्री (वायरमन) | ९ | १०% |
| ८ | यांत्रिकी रेडियो, टी.व्ही. | ३ | ३% |
| ९ | कॉम्प्युटर ऑपरेटर | २ | २% |
| १० | पंप ऑपरेटर मेकॅनिक | १ | १% |
| ११ | आरेखक स्थापत्य | १ | १% |
| | **एकूण** | **९४** | **१००%** |

वरील ९४ उमेदवारांपैकी १७ उमेदवार पुढील शिक्षण घेत असून ९ उमेदवार अॅप्रेंटिंसशिप करत असल्याचे निदर्शनास आले. वीजतंत्री अभ्यासक्रमातील १ उमेदवारास वीज मंडळामध्ये नोकरी लागल्याचे निदर्शनास आले आहे. १० उमेदवार खाजगी व्यवसाय करीत असून ५७ उमेदवार शेती व शेतमजुरी अथवा इतर मजुरी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. अधिक माहितीसाठी परिशिष्ट-३ पहावे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आवश्यक असणारे व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करुनही सदर प्रशिक्षणाचा आवश्यक तो लाभ पुढील कालावधीत प्रशिक्षणार्थींनी घेतलेला दिसून येत नाही.

**उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अॅप्रेंटिसशिपसाठी परावृत्त करणे :**

ज्या विद्यार्थ्यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण पूर्ण केले आहे. त्या सर्वांना त्यांनी प्राप्त केलेल्या विषयाच्या संदर्भातील किमान ६ महिन्यांसाठी शिकाऊ उमेदवार म्हणून संधी मिळवून देणे आवश्यक आहे. त्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने त्यांचे कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांचेशी संपर्क साधून उमेदवारांना शिकाऊ उमेदवार म्हणून घेण्यासाठी बंधनकारक करण्याची गरज आहे. त्यासाठी शासन स्तरावरुन आदेश होणे आवश्यक आहे.

अॅप्रेंटिसशिपसाठी विद्यार्थ्याचे मागणीनुसार संबंधित विभागास बंधनकारक असावे, जेणेकरुन अॅप्रेंटिसशिप नंतर त्याच विभागात नोकरीसाठी प्राधान्यक्रम राहील. जेणेकरुन प्रशिक्षणार्थींना रोजगार / स्वयं रोजगारासाठी इतरत्र फिरावे लागणार नाही.

–x–x–x–

**प्रकरण क्र.५**

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेश, गळती व निकाल

**अ-१)** १७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आरक्षित असलेल्या जागा, प्राप्त अर्ज व प्रत्यक्ष प्रवेश या संदर्भातील सन २००१-२००२ तसेच २००२-२००३ या वर्षाची स्थिती पुढील प्रमाणे आहे.

२००१-२००२ वर्षातील आरक्षित जागा, प्राप्त अर्ज व प्रत्यक्ष प्रवेश यांची औद्योगिक प्रशिक्षण संस्थानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विभाग व जिल्हा | तालुका | तालुक्या-तील एकूण आदिवासी लोकसंख्या | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नांव | आदिवासीं साठी आरक्षित जागा | प्राप्त अर्ज (आदिवासी) | प्रत्यक्ष प्रवेश | रिक्त जागा | रिक्त जागेची आरक्षित जागेशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **मुंबई विभाग** | | | | | | | | |
| | १. ठाणे | १. शहापूर | ८९,९९७ | शहापूर | ४५ | २६ | ११ | ३४ | ७६ |
| | | २. वाडा | ७५,१८५ | वाडा | ५७ | २० | ८ | ४९ | ८६ |
| | | ३. मुरबाड | ३८,५१८ | मुरबाड | ५७ | ३ | - | ५७ | १०० |
| | | **एकूण** | | | **१५९** | **४९** | **१९** | **१४०** | **८८** |
| २ | **नाशिक विभाग** | | | | | | | | |
| | १. नाशिक | १. कळवण | १,०८,९५५ | कळवण | १७४ | २६३ | १६६ | ८ | ५ |
| | | २. दिंडोरी | १,३९,०३३ | दिंडोरी | २५५ | ११७६ | १५२ | १०३ | ४० |
| | | ३. इगतपुरी | ८६,३७० | इगतपुरी | ६९ | ३०५ | ३३ | ३६ | ५२ |
| | | **एकूण** | | | **४९८** | **१७४४** | **३५१** | **१४७** | **३०** |
| | २. नंदूरबार | ४. शहादा | १,६३,०४१ | शहादा | ५७ | १६६ | ४५ | १२ | २१ |
| | | ५. तळोदा | ९२,९१८ | तळोदा | ६९ | ८९ | ४४ | २५ | ३६ |
| | | ६. नंदूरबार | १,२०,०४८ | नंदूरबार | २९७ | १७७९ | २०० | ९७ | ३३ |
| | | **एकूण** | | | **४२३** | **२०३४** | **२८९** | **१३४** | **३२** |
| ३ | **अमरावती विभाग** | | | | | | | | |
| | १. अमरावती | १. अचलपूर | २५,२३३ | अचलपूर | ६ | २० | ५ | १ | १७ |
| | | २. धारणी | १,११,१६१ | धारणी | ५७ | १६५ | ३२ | २५ | ४४ |
| | | ३. चिखलदरा | ७२,०७४ | चिखलदरा | १०२ | ५७४ | ७२ | ३० | २९ |
| | २. यवतमाळ | ४. पांढरकवडा | ५१,९७१ | पांढरकवडा | १२६ | ३५५ | ६५ | ६१ | ४८ |
| | | **एकूण** | | | **२९१** | **१११४** | **१७४** | **११७** | **४०** |
| ४ | **औरंगाबाद विभाग** | | | | | | | | |
| | १. नांदेड | १. किनवट | ५८,५२७ | किनवट | ९० | ११७ | ७९ | ११ | १२ |
| | | २. हदगांव | २४,९८६ | हदगांव | ३ | ५५ | २ | १ | ३३ |
| | | **एकूण** | | | **९३** | **१७२** | **८१** | **१२** | **१३** |
| ५ | **नागपूर विभाग** | | | | | | | | |
| | १. चंद्रपूर | १. कोरपना | ३६,५७३ | कोरपना | ४५ | ३६ | १६ | २९ | ६४ |
| | | २. राजूरा | ३४,३०४ | राजूरा | १२३ | १०८ | ११७ | ६ | ५ |
| | | | | | **१६८** | **१४४** | **१३३** | **३५** | **२१** |
| | | | | | १६३२ | ५२५७ | १०४७ | ५८५ | ३६ |

## अ-२) सन २००२-२००३ प्रवेश :

| अ. क्र. | विभाग व जिल्हा | तालुका | तालुक्या-तील एकूण आदिवासी लोकसंख्या | औद्योगिकप्र शिक्षण संस्थेचे नांव | आदिवासीं साठी आरक्षित जागा | प्राप्त अर्ज (आदिवासी) | प्रत्यक्ष प्रवेश | रिक्त जागा | रिक्त जागेची आरक्षित जागेशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **मुंबई विभाग** | | | | | | | | |
| | १. ठाणे | १. शहापूर | ८९,९९७ | शहापूर | २१ | १४ | ४ | १७ | ८१ |
| | | २. वाडा | ७५,९८५ | वाडा | ५७ | ३२ | १६ | ४१ | ७२ |
| | | ३. मुरबाड | ३८,५१८ | मुरबाड | ३३ | २ | ० | ३३ | १०० |
| | | **एकूण** | | | **१११** | **४८** | **२०** | **९१** | **८२** |
| २ | **नाशिक विभाग** | | | | | | | | |
| | १. नाशिक | १. कळवण | १,०८,९५५ | कळवण | १७४ | १८७ | १५९ | १५ | ९ |
| | | २. दिंडोरी | १,३९,०३३ | दिंडोरी | ३४२ | १२९ | १९१ | १५१ | ४४ |
| | | ३. इगतपुरी | ८६,३७० | इगतपुरी | ४५ | ०८ | ०८ | ३७ | ८२ |
| | | **एकूण** | | | **५६१** | **३२४** | **३५८** | **२०३** | **३६** |
| | २. नंदूरबार | ४. शहादा | १,६३,०४१ | शहादा | २१ | ८७ | १५ | ६ | २९ |
| | | ५. तळोदा | ९२,९१८ | तळोदा | ४५ | ७१ | ३५ | १० | २२ |
| | | ६. नंदूरबार | १,२०,०४८ | नंदूरबार | २९७ | ६५५ | २१२ | ८५ | २९ |
| | | **एकूण** | | | **३६३** | **८१३** | **२६२** | **१०१** | **२८** |
| ३ | **अमरावती विभाग** | | | | | | | | |
| | १. अमरावती | १. अचलपूर | २५,२३३ | अचलपूर | ३ | ८ | ३ | ० | ० |
| | | २. धारणी | १,११,१६१ | धारणी | ३० | ४० | २१ | ९ | ३० |
| | | ३. चिखलदरा | ७२,०७४ | चिखलदरा | ११४ | १३८ | ४१ | ७३ | ६४ |
| | २. यवतमाळ | ४. पांढरकवडा | ५१,९७१ | पांढरकवडा | ७८ | १९२ | ४५ | ३३ | ४२ |
| | | **एकूण** | | | **२२५** | **३७८** | **११०** | **११५** | **५१** |
| ४ | **औरंगाबाद विभाग** | | | | | | | | |
| | १. नांदेड | १. किनवट | ५८,५२७ | किनवट | ९० | ११७ | ७९ | ६५ | ७२ |
| | | २. हदगांव | २४,९८६ | हदगांव | ३ | ५५ | २ | १ | ३३ |
| | | **एकूण** | | | **९३** | **१३७** | **२७** | **६६** | **७१** |
| ५ | **नागपूर विभाग** | | | | | | | | |
| | १. चंद्रपूर | १. कोरपना | ३६,५७३ | कोरपना | ६९ | ११ | ११ | ५८ | ८४ |
| | | २. राजूरा | ३४,३०४ | राजूरा | १५९ | ९२ | ३८ | १२१ | ७६ |
| | | **एकूण** | | | **२२८** | **१०३** | **४९** | **१७९** | **७९** |
| | | एकूण | | | १५८१ | १८०३ | ८२६ | ७५५ | ४८ |

सन २००१-२००२ व २००२-२००३ या वर्षातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १५ व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील २ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्रवेश क्षमतेचे अवलोकन केले असता कोणत्याही औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पूर्ण क्षमतेने प्रवेश झाल्याचे दिसून येत नाही. वर्षनिहाय प्रत्यक्ष आरक्षित जागा व प्रत्यक्ष प्रवेश व रिक्त जागा खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वर्ष | एकूण आरक्षित जागा | प्रत्यक्ष प्रवेश | रिक्त जागा | टक्केवारी (रिक्त) |
|---|---|---|---|---|---|
| १. | २००१-२००२ | १६३२ | १०४७ | ५८५ | ४७% |
| २. | २००२-२००३ | १५८१ | ८२६ | ७५५ | ५२% |
| | **एकूण** | **३२१३** | **१८७३** | **१३४०** | **४२%** |

सन २००१-२००२ मधील रिक्त जागा या ५८५ आढळून आलेल्या आहेत व २००२-२००३ मध्ये ७५५ जागा रिक्त असल्याचे दिसून येते. याचा अर्थ सरासरी ४२ % दरवर्षी रिक्त जागा आढळून येतात.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था या प्रामुख्याने आदिवासी भागातच कार्यरत असल्याने पदे रिक्त राहणे हे सयुक्तीक वाटत नाही. याचा अर्थ व्यवसायाभिमुख प्रशिक्षण संदर्भात आदिवासी मध्ये पुरेशी जाणीव जागृती झाल्याचे दिसून येत नाही. यासाठी संबंधित संस्थांनी त्याचे तालुक्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्था संदर्भात व त्यामध्ये शिकविले जाणारे व्यवसायाभिमुख प्रशिक्षण संदर्भात पुरेशी प्रसिध्दी देणे आवश्यक आहे.

सन २००३-२००४ या वर्षाचा राज्यातील **खाजगी औद्योगिक प्रशिक्षण** संस्थांमधील प्रवेश क्षमता प्रत्यक्ष प्रवेश पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभाग | औ.प्र. संस्था संख्या | मंजूर जागा | प्रत्यक्ष दिलेला प्रवेश | रिक्त जागा | रिक्त जागाची मंजूर जागेशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुंबई | ४० | ३४५२ | १७७१ | १६८१ | ४९ |
| २. | पुणे | ४६ | ५८८० | २६७२ | ३२०८ | ५५ |
| ३. | नाशिक | ८३ | ११०३६ | ३०८८ | ७९४८ | ७२ |
| ४. | औरंगाबाद | २२ | २०५२ | ७१३ | १३३९ | ६५ |
| ५. | अमरावती | ७ | ६३६ | २५४ | ३८२ | ६० |
| ६. | नागपूर | ४३ | ४३२० | २०१२ | २३०८ | ५३ |
| | **एकूण** | **२४१** | **२७३७६** | **१०५१०** | **१६८६६** | **६२** |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील ५०% पेक्षा जास्त रिक्त जागा असल्याचे दिसून येते.

**ब-१) प्राप्त अर्ज व प्रवेश :**

१७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्रवेशाबाबतचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास येत आहेत. त्याची विभागवार / जिल्हावार तपशील खालील प्रमाणे आहे.

**२००१-२००२ वर्ष**

| अ. क्र. | विभाग | जिल्हा | अनु.जमाती साठी आरक्षित असलेल्या एकूण जागा | प्रवेशासाठी प्राप्त झालेले अनु. जमातीचे एकूण अर्ज | प्रत्यक्ष प्रवेश (अनुसूचित जमाती) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुंबई विभाग | ठाणे | १५९ | ४९ | १९ | |
| २. | नाशिक विभाग | अ) नाशिक | ४९८ | १७४४ | ३५१ | |
| | | ब) नंदूरबार | ४२३ | २०३४ | २८९ | |
| ३. | अमरावती | अ) अमरावती व यवतमाळ | २९१ | १११४ | १७४ | |
| ४. | औरंगाबाद | नांदेड | ९३ | १७२ | ८१ | |
| ५. | नागपूर | चंद्रपूर | १६८ | १४४ | १३३ | |
| | **एकूण** | | **१६३२** | **५२५७** | **१०४७** | |

**ब-२) २००२-२००३ वर्ष**

| अ. क्र. | विभाग | जिल्हा | अनु.जमाती साठी आरक्षित असलेल्या एकूण जागा | प्रवेशासाठी प्राप्त झालेले अनु. जमातीचे एकूण अर्ज | प्रत्यक्ष प्रवेश (अनुसूचित जमाती) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुंबई विभाग | ठाणे | १११ | ४८ | २० | |
| २. | नाशिक विभाग | अ) नाशिक | ५६१ | ३२४ | ३५८ | |
| | | ब) नंदूरबार | ३६३ | ८१३ | २६२ | |
| ३. | अमरावती | अ) अमरावती व यवतमाळ | २२५ | ३७८ | ११० | |
| ४. | औरंगाबाद | नांदेड | ९३ | १३७ | २७ | |
| ५. | नागपूर | चंद्रपूर | २२८ | १०३ | ४९ | |
| | **एकूण** | | **१५८१** | **१८०३** | **८२६** | |

प्राप्त अर्ज व प्रत्यक्ष प्रवेश या संदर्भात वर नमूद केलेल्या तालीकेचे अवलोकन केले असता सन २००१-२००२ व सन २००२-२००३ या वर्षात प्राप्त अर्जाची संख्या व प्रत्यक्ष प्रवेश यात तफावत दिसून येते. उदा. सन २००१-२००२ या वर्षात एकूण १६३२ एवढया जागा अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असल्याचे दिसून येते व त्यासाठी एकूण ५२५७ अर्ज प्राप्त झालेले आहेत. परंतु प्रत्यक्ष १०४७ एवढयाच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेला असल्याचे दिसून येते. याचा अर्थ (१६३२ - १०४७ = ५८५) जागा रिक्त असल्याचे दिसून येते. संस्था प्रमुखांनी जरी ट्रेडचे क्षमतेनुसार प्रवेश दिला असला तरी संबंधित ट्रेडसाठी जास्त अर्ज प्राप्त झाले असल्यास अशा उमेदवारांना दुसऱ्या ट्रेडसाठी प्रवेश घेणेबाबत प्रवृत्त करणे गरजेचे आहे. परंतु तसे केल्याचे दिसून येत नाही. वास्तविक संबंधित संस्थेकडील ट्रेडची भरती संख्या पूर्ण झाली असल्यास उमेदवारांना जिल्हयातील दुसऱ्या नजीकच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. वरील पध्दतीने कार्यवाही न केल्याने सुमारे १८०३ अर्जांची संख्या उपलब्ध असून प्रवेश अंदाजे ५०% झालेला नाही.

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निकाल विवरण

अ) महाराष्ट्र राज्यातील ७ जिल्हयातील सर्व्हेक्षण करण्यात आलेल्या १७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रवेशित विद्यार्थी, परीक्षेला बसलेले व उत्तीर्ण झालेले आदिवासी व बिगर आदिवासी विद्यार्थ्यांचे संदर्भातील सन २००१-२००२ व २००२-२००३ या वर्षांची स्थिती पुढील प्रमाणे आहे.

### २००१-२००२ चे विवरणपत्र

| अ. क्र. | विभाग/जिल्हा | औद्यो. प्रशिक्षण संस्थेचे नांव | प्रवेशित विद्यार्थी | | | परीक्षेला बसलेले | | | उत्तीर्ण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आदि वासी | बिगर आदि-वासी | एकूण | आदि वासी | बिगर आदि वासी | एकूण | आदि वासी | बिगर आदि वासी | एकूण |
| १. | मुंबई विभाग | | | | | | | | | | |
| | १. ठाणे | १. शहापूर | ११ | ५३ | ६४ | १ | २७ | २८ | - | २० | २० |
| | | २. वाडा | ८ | ५३ | ६१ | ३ | २१ | २४ | ३ | ९ | १२ |
| | | ३. मुरबाड | - | ६६ | ६६ | - | ५५ | ५५ | - | ५५ | ५५ |
| | | **एकूण** | **१९** | **१७२** | **१९१** | **४** | **१०३** | **१०७** | **३** | **८४** | **८७** |
| **२.** | **नाशिक विभाग** | | | | | | | | | | |
| | १. नाशिक | १. कळवण | १६६ | ७० | २३६ | ६३ | ३२ | ९५ | १९ | ८ | २७ |
| | | २. दिंडोरी | १५२ | १८८ | ३४० | ९८ | १४७ | २४५ | ६६ | १२८ | १९४ |
| | | ३. इगतपुरी | ३३ | ६८ | १०१ | ९ | ४८ | ५७ | ३ | ४३ | ४६ |
| | | **एकूण** | **३५१** | **३२६** | **६७७** | **१७०** | **२२७** | **३९७** | **८८** | **१७९** | **२६७** |
| | २. नंदूरबार | ४. शहादा | ४५ | ३२ | ७७ | ११ | १५ | २६ | ९ | १७ | २६ |
| | | ५. तळोदा | ४४ | ३७ | ८१ | २१ | ४२ | ६३ | २० | ४० | ६० |
| | | ६. नंदूरबार | २०० | १४६ | ३४६ | २१७ | २०० | ४१७ | १६७ | ११० | २७७ |
| | | **एकूण** | **२८९** | **२१५** | **५०४** | **२४९** | **२५७** | **५०६** | **१९६** | **१६७** | **३६३** |

| अ. क्र. | विभाग/जिल्हा | औद्यो. प्रशिक्षण संस्थेचे नांव | प्रवेशित विद्यार्थी | | | परीक्षेला बसलेले | | | उत्तीर्ण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आदिवासी | बिगर आदि-वासी | एकूण | आदिवासी | बिगर आदिवासी | एकूण | आदिवासी | बिगर आदिवासी | एकूण |
| ३. | **अमरावती विभाग** | | | | | | | | | | |
| | १. अमरावती | १. अचलपूर | ५ | ८५ | ९० | ४ | ७१ | ७५ | ३ | ६९ | ७२ |
| | | २. धारणी | ३२ | ४४ | ७६ | ५ | २३ | २८ | ३ | १८ | २१ |
| | | ३. चिखलदरा | ७२ | ६६ | १३८ | ५४ | ९० | १४४ | ३७ | ७६ | ११३ |
| | २. यवतमाळ | ४. पांढरकवडा | ६५ | ११२ | १७७ | ४९ | ९६ | १४५ | २१ | ३५ | ५६ |
| | | **एकूण** | **१७४** | **२०७** | **३८१** | **११२** | **२८०** | **३९२** | **६४** | **१९८** | **२६२** |
| ४. | **औरंगाबाद विभाग** | | | | | | | | | | |
| | १. नांदेड | १. किनवट | ७९ | ६२ | १४१ | ७४ | ५८ | १३२ | ६४ | ४६ | ११० |
| | | २. हदगांव | २ | ४२ | ४४ | - | ४२ | ४२ | - | ४२ | ४२ |
| | | **एकूण** | **८१** | **१०४** | **१८५** | **७४** | **१००** | **१७४** | **६४** | **८८** | **१५२** |
| ५. | **नागपूर विभाग** | | | | | | | | | | |
| | १. चंद्रपूर | १. कोरपना | १६ | ४६ | ६२ | १४ | ७० | ८४ | १३ | ६८ | ८१ |
| | | २. राजूरा | ११७ | ७७ | १९४ | ३३ | १६१ | १९४ | १२ | ७२ | ८४ |
| | | **एकूण** | **१३३** | **१२३** | **२५६** | **४७** | **२३१** | **२७८** | **२५** | **१४०** | **१६५** |
| | एकूण बेरीज | | १०४७ | ११४७ | २१९४ | ६५६ | ११९८ | १८५४ | ४४० | ८५६ | १२९६ |

## २००२-२००३ चे विवरणपत्र

| अ. क्र. | विभाग/जिल्हा | औद्यो. प्रशिक्षण संस्थेचे नांव | प्रवेशित विद्यार्थी | | | परीक्षेला बसलेले | | | उत्तीर्ण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आदिवासी | बिगर आदि-वासी | एकूण | आदिवासी | बिगर आदिवासी | एकूण | आदिवासी | बिगर आदिवासी | एकूण |
| १. | मुंबई विभाग | | | | | | | | | | |
| | १. ठाणे | १. शहापूर | ४ | २७ | ३१ | १० | ४२ | ५२ | ८ | ३४ | ४२ |
| | | २. वाडा | १६ | २३ | ३९ | १३ | १८ | ३१ | १० | २६ | ३६ |
| | | ३. मुरबाड | - | ४२ | ४२ | - | ३० | ३० | - | ३० | ३० |
| | | **एकूण** | **२०** | **९२** | **११२** | **२३** | **९०** | **११३** | **१८** | **९०** | **१०८** |
| २. | **नाशिक विभाग** | | | | | | | | | | |
| | १. नाशिक | १. कळवण | १५९ | ८५ | २४४ | ९४ | ६३ | १५७ | ३४ | ४० | ७४ |
| | | २. दिंडोरी | १९१ | २४८ | ४३९ | ८३ | ११६ | १९९ | ८० | १०८ | १८८ |
| | | ३. इगतपुरी | ८ | ५० | ५८ | २१ | ४९ | ७० | १७ | ३७ | ५४ |
| | | **एकूण** | **३५८** | **३८३** | **७४१** | **१९८** | **२२८** | **४२६** | **१३१** | **१८५** | **३१६** |
| | २. नंदूरबार | ४. शहादा | १५ | १३ | २८ | ३६ | ३० | ६६ | ३६ | ३० | ६६ |
| | | ५. तळोदा | ३५ | २९ | ६४ | ११ | २१ | ३२ | ११ | १९ | ३० |
| | | ६. नंदूरबार | २१२ | २०० | ४१२ | १८७ | २०० | ३८७ | १८७ | १९० | ३७७ |
| | | **एकूण** | **२६२** | **२४२** | **५०४** | **२३४** | **२५१** | **४८५** | **२३४** | **२३९** | ४७३ |

| अ. क्र. | विभाग/जिल्हा | औद्यो. प्रशिक्षण संस्थेचे नांव | प्रवेशित विद्यार्थी | | | परीक्षेला बसलेले | | | उत्तीर्ण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
